कला अकादमी गोवा



# नियमावली

## मराठी नाटयस्पर्धा

## अ / ब गट

# कला अकादमी गोवा

## मराठी नाटयस्पर्धा–‘अ’ व ‘ब’ गट

## नियम व अटी

कला अकादमी नाटयस्पर्धेत भाग घेऊ इच्छिणा–या संस्थानी खालील नियम व अटी पु–या कराव्या लागतील.

१. ज्या संस्था १८६० च्या सोसायटी रजिस्ट्रेशन कायद्यानुसार अधिकृतपणे नोंद झालेल्या आहेत व आवश्यक ती नूतनीकरण प्रक्रिया पूर्ण केलेली आहे अशा संस्थानाच नाटयस्पर्धेत प्रवेश देण्यात येईल. कोणत्याही शाळेला संस्थेच्या नावाने नाटयस्पर्धेत प्रवेश देण्यात येणार नाही. परंतु अशा शिक्षण संस्थेचा एखादा कला विभाग संस्था रजिस्ट्रेशन कायद्यानुसार स्वतंत्रपणे नोंद केलेला असेल तर त्या विभागातर्फे स्पर्धेत प्रवेशिका सादर करता येईल. कला अकादमीने निश्चित केलेल्या कार्यक्रमानुसार स्पर्धक संस्थाना आपापले प्रयोग सादर करावे लागतील.

२. सदर स्पर्धा ही केवळ गोमंतकीय संस्था व कलाकारांसाठीच असल्यामुळे गोव्याबाहेरील संस्थांना व कलाकारांना त्यात सहभागी होता येणार नाही. कुठल्याही सहभागी संस्थेतर्फे अशा संबंधीची लेखी तक्रार केल्यास संबंधित कलाकारांचे सक्षम प्राधिकारीणीने दिलेले अधिकृत ओळखपत्र अथवा तत्सम/समकक्ष दस्तावेजाची प्रत संस्थाप्रमुखाला अकादमीच्या मागणीनुसार सादर करावे लागेल. या नियमाचे उल्लंघन झाल्याचे सिध्द झाल्यास संबधित संस्थेवर योग्य ती कारवाई केली जाईल.

३. स्पर्धेत भाग घेण्यासाठी करावयाचे अर्ज निर्धारित प्रवेशपत्रिकेत भरुन जाहीर करण्यात आलेल्या मुदतीत कला अकादमीच्या कचेरीत पोचणे आवश्यक आहे.

४. प्रवेशिका सुपुर्द करतेवेळी त्यातील संपूर्ण माहितीसह स्पर्धक संस्थेने आपली प्रवेशिका आवश्यक प्रवेशशुल्क आणि अनामत रकमेसह निर्धारित मुदतीत कला अकादमी कचेरीत पोचती करणे आवश्यक आहे. प्रवेशिके सोबत प्रत्येक संस्थांनी आपल्या बँक खात्याचा तपशील (xerox copy of Passbook/Cancelled Cheque) जोडणे आवश्यक आहे. कोणतेही कारण न देता सदर प्रवेशिका स्वीकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार संपूर्णपणे कला अकादमीला राहील.

५. ही नाटयस्पर्धा मराठी भाषेतील नाटकांपुरतीच मर्यादित असेल. कमीत कमी पाच नाटके स्पर्धेसाठी असल्याखेरीज स्पर्धेची कार्यवाही केली जाणार नाही. अर्थातच स्पर्धेची कार्यवाही न झाल्यास अनामत रक्कम परत करण्यात येईल.

६. प्रवेशिका मागे घेण्यासाठी चिठ्ठया टाकून ठरविलेल्या अनुक्रमानंतर ५ दिवसांची मुदत राहील. सदरच्या मुदतीत संबंधित संस्थेला नाटकाची संहिता अथवा नाव बदलण्याची मुभा राहील. मात्र त्यानंतर बदल करता येणार नाही. त्या अवधीत इच्छुक संस्थाना प्रवेशिका मागे घेता येतील व त्याना त्यांची अनामत रक्कम परत करण्यात येईल. परंतु या मुदतीनंतर प्रवेशिका मागे घेतल्यास अनामत रक्कम परत केली जाणार नाही.

७. स्पर्धेत प्रवेशिका सादर करतेवेळी केवळ संस्थेचे नाव, नोंदणीकरण क्रमांक, तारीख, नाटकाचे नाव व लेखकाचे नाव इत्यादि तपशील सादर करणे आवश्यक आहे. प्रयोगाच्या दिवशी निर्धारित नमुन्यातील अन्य सर्व तपशील यांच्या पाच प्रती व संहितेच्या चार (४) प्रती तसेच नवीन संहिता/खास स्पर्धेसाठी लिहीलेली संहिता असल्यास सादरीकरणाच्या तीन दिवस अगोदर कला अकादमीकडे चार (४) प्रती पोचत्या करण्याची संपूर्ण जबाबदारी स्पर्धक संस्थेवर राहील.

८. स्पर्धक संस्थेला आपल्या प्रवेशिकेसोबत रु.५००/-(रुपये पाचशे मात्र) प्रवेशशुल्क आणि कला अकादमीच्या मालमत्तेच्याबाबत व प्रयोग सादर करण्याची हमी म्हणून, प्रवेशिकेसोबत प्रवेशशुल्काव्यतिरिक्त रु.५०००/-(रुपये पाच हजार मात्र) रोख अनामत रक्कम कला अकादमीकडे भरणा करावी लागेल. संबंधित नाटयसंस्थेचा नाटयप्रयोग स्पर्धेत सादर झाल्यावर त्या प्रयोगासंबंधी कला अकादमीच्या मालमत्तेची कोणतीही नुकसानी संबंधित संस्थेकडून झालेली नसल्यास, सदर अनामत रक्कम परत करण्यात येईल. मात्र संबंधित स्पर्धक संस्थेकडून अशी नुकसानी झाल्यास त्याची भरपाई वरील रक्कमेतून करुन घेऊन उर्वरित रक्कम परत करण्यात येईल. परंतु संस्थेकडून झालेली नुकसानी या अनामत रकमेपेक्षा जास्त असल्यास ती त्वरित अकादमीला देण्याची जबाबदारी पूर्णत: स्पर्धक संस्थेवर राहील.

९. स्पर्धेत भाग घेणा-या संस्थेला सादर करावयाच्या नाटकाचे स्वरुप, विशेषत: ते नाटक स्वतंत्र आहे किंवा भाषांतरीत आहे किंवा दुस-या नाटकाचे रुपांतर आहे हे, मूळ लेखक, भाषा यांचा निर्देश करुन प्रवेशिका सादर करतेवेळी नमूद करावे लागेल. स्पर्धेचे नाटक, कथा, कादंबरी इत्यादि अन्य वाङ्.मय प्रकारांवर आधारित असेल तर तसाही उल्लेख करावा लागेल.

१०. संस्थेला त्यानी निवडलेले नाटक नवीन असल्यास व ते स्पर्धेकरिता खास लिहिलेले असल्यास तसा स्पष्ट उल्लेख करावा लागेल. लहान मुलांची नाटके अथवा सांगितिका स्वीकारल्या जाणार नाहीत.

११. सर्व स्पर्धकांची संपूर्ण नावे, संबंधित भूमिकांच्या निर्देशासहित नाटकाचे दिग्दर्शन, नेपथ्य, प्रकाशयोजना व ध्वनिसंकलनाची जबाबदारी सांभाळणा-या कलाकारांची व तंत्रज्ञांच्या नामावलीच्या पाच प्रती सादरीकरणाच्या दिवशी सायं ५.०० वाजेपर्यंत अकादमीच्या संबंधित प्रतिनिधिकडे दाखल कराव्या लागतील. वर उल्लेखित प्रत्येक क्षेत्रात केवळ एकच व्यक्ती पारितोषिकासाठी पात्र ठरेल. दिग्दर्शन, नेपथ्य, प्रकाशयोजना यासाठी सहाय्यक कलाकारांचा नामावलीत समावेश असला तरी सदर नामावलीतील केवळ प्रथम स्थानावरील एकच नाव बक्षिसासाठी ग्राहय मानण्यात येईल. पारितोषिके विभागून दिली जाणार नाहीत.

१२. एकदा सादरीकरणाचा अनुक्रम ठरविल्यानंतर त्यात कोणताही फेरफार करता येणार नाही.

१३. 'अ' तसेच 'ब' गटात गोमंतकीय लेखकाने स्पर्धेसाठी खास लिहिलेल्या नाटकास तसेच आधारित/अनुवादित/रुपांतरित केलेल्या संहितेस परीक्षक मंडळाने शिफारस केल्यास लेखनाचे पारितोषिक देण्यात येईल. स्पर्धेसाठी खास लिहिलेल्या नाटकात किंवा छापील नाटकात काही आक्षेपार्ह मजकूर असल्यास अकादमीने दिलेला त्यासंबंधीचा निर्णय स्पर्धक संस्थांवर बंधनकारक राहील. **संहितेच्या प्रति टंकलिखीत स्वरुपात किंवा सुवाच्च हस्ताक्षरात लिहील्या असल्या पाहिजेत.**

१४. एकदा स्पर्धेत सहभागी झालेल्या संस्थेला/कलाकारांच्या संचाला तेच नाटक त्याच कलाकारांना घेऊन त्याच अथवा कोणत्याही दुस-या संस्थेच्या नावाखाली या स्पर्धेत सादर करता येणार नाही. या स्पर्धेत एकदा सादर केलेल्या एखाद्या नाटयप्रयोगातील वैयक्तिक भूमिकेसाठी पारितोषिकपात्र ठरलेल्या कलाकाराला परत त्याच प्रयोगात तीच भूमिका सादर करता येणार नाही. या संबंधीचा अकादमीचा निर्णय अंतिम राहील.

१५. नाटयस्पर्धेत सादर केल्या जाणा-या कुठल्याही नाटकाची कालमर्यादा मध्यंतरासह दोन तासांपेक्षा कमी व तीन तासांपेक्षा जास्त असता कामा नये. मध्यंतर किमांन १० मिनीटे व जास्तीत जास्त १५ मिनिटांचे असेल. नाटकात दोनपेक्षा जास्त मध्यंतरे असता कामा नयेत. दोन मध्यंतरे असल्यास दोन्ही मंध्यंतरांचा एकूण अवधी १५ मिनीटांपेक्षा अधिक असता कामा नये.

१६. स्पर्धक संस्थेने सादर केलेल्या नामावलीतील कोणत्याही कलाकारास (तंत्रज्ञासह)कोणत्याही एकाच गटातून ('अ' किंवा 'ब') आणि एकाच नाटकात सहभागी होता येईल.

१७. पुरुषानी स्त्रियांच्या किंवा स्त्रियांनी पुरुषांच्या भूमिका करणे म्हणजे नियमभंग समजला जाईल. मात्र संहितेनुसार तशा भूमिका करणे अपरिहार्य असल्यास तशी मुभा राहील. या बाबतीत परीक्षक मंडळाचा निर्णय अंतिम राहील

१८. निवड झालेल्या स्पर्धक संस्थांच्या प्रयोगासाठी अकादमीच्यावतीने जास्तीत जास्त रंगमंच, प्रकाशयोजना, ध्वनियंत्रणा यांची सोय खालीलप्रमाणे करण्यात येईल :-

१. सहा जनरल लाईटस

२. दहा पारलाईट

३. एक हजार वॅटस क्षमतेचे २० स्पॉटलाईट

४. सायक्लोराम आणि दोन सोलर

५. आठ ध्वनिक्षेपक.

६.मुख्य व मागील पडदा व बाजूच्या तरफा

७. उपलब्ध असलेले जास्तीत जास्त सोळा फ्लॅटफॉर्मस. (उपलब्धतेनुसार या संदर्भात अकादमीचा निर्णय अंतिम राहिल)

नाटकासाठी वरील सामानापेक्षा अतिरिक्त व्यवस्था हवी असल्यास त्याची आणि रंगभूषा, वेषभूषा अथवा खास नेपथ्य, खास प्रकाशयोजना याची व्यवस्था स्पर्धक संस्थेला स्वखर्चाने करावी लागेल. त्याव्यतिरिक्त साधने हवी असल्यास ती अन्य ठिकाणाहून मिळविण्याची जबाबदारी स्पर्धक संस्थेवर राहील. **कला अकादमीच्या दिनानाथ मंगेशकर सभागृह व्यतिरिक्त इतर कुठल्याही सभागृहात नाटक सादर करत असताना, तिथे उपलब्ध असलेल्या साधनसुविधा सहभागी संस्थाना पुरविल्या जातील. सहभागी संस्थाना काही विशेष साधनसुविधांची आवश्यकता असल्यास सदर साधनसुविधा उपलब्ध करण्याची जबाबदारी त्या त्या संस्थांवर राहील. सदर विशेष साधनसुविधा उपलब्ध करण्यास कला अकादमी जबाबदार राहणार नाही याची कृपया सहभागी संस्थानी नोंद घ्यावी.**

१९. स्पर्धेतील संपूर्ण नाटकाचे चित्रीकरण करण्यासाठी स्पर्धक संस्थेला एका दूरचित्रवाणी कॅमे-याने चित्रीकरण करण्यास परवानगी देण्यात येईल. त्यासाठी चित्रीकरण करणा-या तंत्रज्ञांचे(कॅमेरामन)छायाचित्र आणि नाव, वय, पत्ता, भ्रमणध्वनी क्र. इ. तपशीलवार माहिती नाटयप्रयोगा अगोदर अकादमीकडे संस्थेच्या लेटरहेडवर लेखी स्वरुपात सादर करावी लागेल.

सदर चित्रीकरण करताना नाटयगृहातील प्रेक्षक, परीक्षक, आयोजक याना कोणत्याही प्रकारचा व्यत्यय/गैरसोय होणार नाही याची संपूर्ण दक्षता कॅमेरामन आणि संस्थेला घ्यावी लागेल. अकादमीला आवश्यक वाटल्यास कोणत्याही क्षणी चित्रीकरण बंद करण्याचा अधिकार अकादमीकडे राहील. चित्रिकरण केलेल्या दस्तवेजाचा कोणत्याही पध्दतीने दुरुपयोग होणार नाही याची जबाबदारीही संबंधित संस्थेला घ्यावी लागेल.

२०. प्रयोगासाठी तंत्रज्ञ म्हणून काम करणा-या कलाकाराचे वय १८ वर्षे पूर्ण होणे आवश्यक आहे. परंतु १८ वर्षाखालील एखादा तंत्रज्ञ रंगमंचामागे काम पाहात असल्यास त्यासाठी सहभागी संस्थेने त्या तंत्रज्ञाचा फोटो नाव,अनुभव इ. माहिती देऊन अकादमीला लेखी कळविणे गरजेचे आहे. नपेक्षा तो नियमभंग मानण्यात येईल.

२१. स्पर्धेत नाटक सादर करताना संबंधित संस्थेने सदर नाटकांचे पांच (५) पेक्षा अधिक प्रयोग स्पर्धेअगोदर सादर केलेले नसावेत. त्या संस्थेने स्पर्धेपूर्वी पाचपेक्षा अधिक प्रयोग केलेले असल्यास व इतर कोणत्याही सहभागी संस्थांनी पुराव्यासह तशी तक्रार दाखल केल्यास त्याची खातरजमा केली जाईल व तक्रार सिध्द झाल्यास ते नाटक स्पर्धेसाठी बाद ठरविण्यात येईल.

२२. संबंधित नाट्यसंस्थेने  स्पर्धेतील नाटयप्रयोग सादरीकरणाच्या तारखेच्या १० दिवस अगोदरच्या कालावधीत नाटक मागे घेतल्यास अथवा नाट्यप्रयोग रद्द केल्यास रुपये पाच हजार अनामत रक्क्म जप्त करण्याव्यतिरिक्त वेगळा पाच हजार रुपये (रु.५०००/-) दंड म्हणून संबंधित संस्थेकडून वसूल केला जाईल. सदर दंडाची रक्कम कला अकादमीने दिलेल्या निर्धारित मुदतीत भरणा न केल्यास त्या संस्थेला तीन वर्षांसाठी कला अकादमीच्या सर्व स्पर्धात सहभागी होण्यास अपात्र ठरविले जाईल. मात्र तसा  निर्णय घेताना कला अकादमीने गठीत केलेल्या समितीशी विचार विनीमय केला जाईल. समितीने घेतलेला निर्णय संस्थेवर बंधनकारक राहील.

२३. लेखकास मानधन देण्याची व स्पर्धेतील प्रयोगासाठी त्याची परवानगी मिळविण्याची जबाबदारी स्पर्धक संस्थेवर राहील. या संदर्भात कोणताही गैरप्रकार झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी स्पर्धक संस्थेवर राहील. तसेच अशा स्वरुपाचा गैरप्रकार घडल्याचे अकादमीच्या निदर्शनास आल्यास संबंधित प्रयोग रद्द करण्याचा अधिकार अकादमीने राखून ठेवला आहे. शिवाय संस्थेला/नटसंचाला पुढील एका वर्षातील अकादमीच्या सर्व  नाटयस्पर्धातून बाद ठरविण्यात येईल.

२४. स्पर्धेत नाटयप्रयोग चालू असताना एखाद्या संस्थेच्या माणसाने प्रयोग सादर करण्यात कोणत्याही स्वरुपाचा अडथळा हेतूपुरस्परपणे आणण्याचा प्रयत्न केल्याचे अकादमीच्या निदर्शनास आल्यास सदर संस्थेला/नटसंचाला/तंत्रज्ञाना अकादमीच्या नाटयस्पर्धेतून भाग घेण्यास पुढील सलग दोन वर्षेपर्यंत मनाई करण्यात येईल.

२५. नाटकातील कलाकारांशिवाय बॅकस्टेजवर जास्तीत जास्त दहा तंत्रज्ञ/सहाय्यकांना प्रवेश देण्यात येईल.

२६. इच्छुक संस्थाना सदर स्पर्धेत 'अ' अथवा 'ब' कोणत्याही गटात सहभागी होण्याची मुभा राहील. त्याचप्रमाणे 'ब' गटातून प्रथम आलेल्या संस्थेला पुढील वर्षी 'अ' गटातून सहभागी व्हावे लागेल. कोणात्याही संस्थेला एकाचवेळी दोन गटातून ('अ' किंवा 'ब') भाग घेता येणार नाही.

२७. स्पर्धेतील नाटयप्रयोगाच्यावेळी संस्थेला जास्तीत जास्त दोन टन वजनापर्यंतच्या वस्तू रंगमंचावर आणता येतील.

२८. (अ) प्रत्येक नाटयप्रयोगाला कला अकादमीच्या नियमानुसार प्रवेशशुल्क आकारले जाईल. नाटयप्रयोगाच्या तिकिट विक्रीतून आलेल्या एकूण रकमेच्या ८० टक्के एवढी रक्कम स्पर्धक संस्थेला देण्यात येईल व २० टक्के रक्कम कला अकादमीकडे राहील. तिकिट विक्रीची व्यवस्था कला अकादमी करील. परंतु जास्तीत जास्त तिकिट विक्री होण्याच्या दृष्टीने संबंधित संस्थेला आपल्या नाटयप्रयोगाच्या जास्तीत जास्त आठ दिवस अगोदर कला अकादमीकडून जास्तीत जास्त ५० टक्के तिकिटे मिळवून परस्पर विक्री करता येईल. मात्र तिकिट विक्रीचा संपूर्ण हिशेब, विक्रीतून आलेली संपूर्ण रक्कम व न विकलेली तिकिटे प्रयोगाच्या दिवशी सायं. ४.०० वाजेपर्यंत स्पर्धास्थळी तिकिट काऊंटरवर अधिकृतपणे जमा करणे आवश्यक आहे.

(ब)त्या व्यतिरिक्त कलाकार व सहाय्यक यांच्यासाठी एका वाहनाचे आणि नेपथ्य प्रकाशयोजना व सामानाच्या वाहतुकीसाठी आवश्यकतेनुसार एका वाहनाचे भाडे (एक बंद टेंपो व एक खुला टेंपो)कला अकादमीकडून रोख देण्यात येईल.त्यासाठी कला अकादमीने निर्धारित केलेला प्रति कि.मी. ठरवून दिलेला भाडेदर ध्यानात घेऊन संस्थेच्या मुख्य कार्यालयापासून ते स्पर्धेच्या ठिकाणी येण्याजाण्याचा वाहतूक खर्च अकादमीकडून दिला जाईल. त्यासाठी संबंधित संस्थेने आर्थिक व्यवहारासाठी आपल्या बँक खात्याचा अधिकृत तपशील देणे गरजेचे आहे.

२९. स्पर्धेतील फक्त ‘अ’ गटातील सर्वोत्कृष्ट प्रथम व व्दितीय पारितोषिक प्राप्त नाटयप्रयोगाची महाराष्ट्र राज्य नाटय महोत्सवाच्या अंतिम फेरीसाठी निवड केली जाईल. मात्र संबंधित संख्या महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक संचालनालयाच्या निर्धारित नियमानुसार असेल. निवड झाल्यावर महाराष्ट्र राज्य नाटयस्पर्धेत भाग घेण्याची व त्यासंदर्भातील सर्व सोपस्कर पूर्ण करण्याची जबाबदारी निवड झालेल्या संबंधित संस्थेवर राहील. यासाठी संस्थेच्या सर्व कलाकाराना महाराष्ट्र शासनाच्या वतीने मिळणारा प्रवासखर्च आणि भत्ता मिळेल. त्याव्यतिरिक्त अंतिम स्पर्धेत सहभागी होणा-या संबंधित संस्थेच्या नाटयकलाकारांना कला अकादमीच्या नियमानुसार भत्ता (जास्तीत जास्त पाच दिवस) देण्यात येईल. त्यासाठीची कालमर्यादाही निर्धारित करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य नाटय महोत्सवात निवड झालेल्या संस्थानी आपल्या सहभागी कलाकारांचा सविस्तर तपशील नाटयप्रयोग सादर केल्यानंतर १० दिवसात कला अकादमीकडे सादर करावा लागेल.

३०. कला अकादमी ही संस्था संघटनात्मक व व्यवस्थापकीय स्वरुपाची संस्था असून नाटयस्पर्धेचा निकाल वेगळया परीक्षक मंडळाकडे असल्यामुळे अकादमीमधील व्यक्तीना किंवा त्यांच्या संबंधित संस्थाना स्पर्धेत भाग घेण्यास मोकळीक राहील.

३१. स्पर्धेतील विद्यमान सर्व बक्षिसे द्यावीत किंवा देऊ नयेत या संबंधीचा निर्णय परीक्षक मंडळाच्या शिफारशीवर अवलंबून राहील. तसेच परीक्षक मंडळाने नाटयस्पर्धेचा समीक्षात्मक/आलोचनात्मक अहवाल दिलेला असल्यास तो व स्पर्धेचा निकाल सर्व स्पर्धक संस्थाना माहितीसाठी पाठविण्यात येईल.

३२. स्पर्धक संस्थेला संबंधित नाटकाच्या दिवशी नाट्यगृह सकाळी **१०.००** वाजता तर एक मदतनीस (हेल्पर) व इलेक्ट्रीशियन दुपारी **२.००** वाजल्यापासून उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच शासकीय पातळीवरील कुठल्याही कार्यक्रमांना शासनाकडून संबंधित सभागृह सकाळच्या सत्रात आरक्षित करण्यात आल्यास सदर दिवशी सहभागी संस्थेला सभागृह दुपारी **२.००** वाजता उपलब्ध करुन देण्यात येईल.

३३. नाट्यप्रयोग संपल्यावर परिक्षकांना आवश्यक वाटल्यास संबंधित नाटयसंस्थेच्या दिग्दर्शक किंवा इतर तंत्रज्ञांशी चर्चा करण्यात येईल.

३४. स्पर्धक संस्थानी आपल्या कलाकारांची नामावली सादर करताना सर्व नावे बँक खात्यानुसार इंग्रजीत नमूद करणे आवश्यक आहे. विजेत्या संस्थांचे तसेच वैयक्तिक पारितोषिक विजेत्यांचे धनादेश त्यानुसारच काढण्यात येतील. त्यामुळे प्रत्येक संस्थानी संबंधित नावे देताना योग्य ती काळजी घ्यावी. धनादेश बदलून देण्यासंदर्भात कोणतीही विनंती कला अकादमी मान्य करणार नाही याची नोंद सर्व स्पर्धक संस्थानी घ्यावी. तसेच धनादेश वैध मुदतीत न वटविल्यास नव्याने धनादेश देण्याची जबाबदारी कला अकादमीवर राहणार नाही.

३५. स्पर्धेसाठी कला अकादमीने नयुक्त केलेल्या परिक्षक मंडळाकडून देण्यात आलेला निकाल आवश्यक कार्यालयीन सोपस्कार पूर्ण झाल्यावर जाहीर करण्यात येईल व तो सर्वावर पूर्णपणे बंधनकारक राहिल. निकालासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. या नियमाचे उल्लंघंन करुन निकालासंदर्भात तक्रारवजा, पत्रव्यवहार करणा-या अथवा निकालावर सार्वजनिक माध्यामातून टिका-टिप्पणी अथवा आलोचना करणा-या सहभागी संस्था व संस्थेशी संबंधिक कलाकारावर योग्य ती कारवाही केली जाईल.

३६. स्पर्धेतील प्रयोग संपल्यापासून दोन तासांच्या आत संपूर्ण रंगमंच रिकामा करुन देण्याची जबाबदारी संस्थेवर राहील. त्यानंतर राहिलेल्या कोणत्याही सामानासंबंधीची जबाबदारी अकादमीवर राहाणार नाही.

## परितोषिके–　　　　　　　　‘अ’ गट नाट्यस्पर्धा

१. **नाटयप्रयोगासाठी (सादरीकरणाचे)**

| | |
|---|---|
| प्रथम पारितोषिक | रु.१,००,०००/– |
| व्दितीय पारितोषिक | रु.७५,०००/– |
| तृतीय पारितोषिक | रु.५०,०००/– |

✲दहापेक्षा जास्त नाटके सादर झाल्यास रु.२५,०००/–ची दोन उत्तेजनार्थ पारितोषिके

२. **दिग्दर्शनासाठी–**

| | |
|---|---|
| प्रथम पारितोषिक | रु.१०,०००/– |
| व्दितीय पारितोषिक | रु.७,०००/– |
| तृतीय पारितोषिक | रु.५,०००/– |

३. **वैयक्तिक अभिनय(पुरुष)**

| | |
|---|---|
| प्रथम पारितोषिक | रु.७०००/– |
| व्दितीय पारितोषिक | रु.५०००/– |

४. **वैयक्तिक अभिनय(स्त्री)**

| | |
|---|---|
| प्रथम पारितोषिक | रु.७०००/– |
| व्दितीय पारितोषिक | रु.५०००/– |

| | | |
|---|---|---|
| ५. | **नेपथ्य–** | रु.५०००/– |
| ६. | **प्रकाशयोजना** | रु.५०००/– |
| ७. | **वेशभूषा** | रु.५०००/– |
| ८. | **ध्वनिसंकलन/पार्श्वसंगीत** | रु.५०००/– |
| ९. | **रंगभूषा** | रु.५०००/– |
| १०. | **नाटयलेखन** | |
| | प्रथम पारितोषिक | रु.१०,०००/– |
| | व्दितीय पारितोषिक | रु.७,०००/– |
| ११. | खास स्पर्धेसाठी अनुवादित/रुपांतरित केलेल्या संहितेसाठी पारितोषिक | रु.१०,०००/– |
| | **एकूण** | **रु.३, ७३,०००/–** |

## परितोषिके– ‘ब’ गट नाट्यस्पर्धा

१. **नाटयप्रयोगासाठी (सादरीकरणाचे)**

| | |
|---|---|
| प्रथम पारितोषिक | रु.५०,०००/- |
| व्दितीय पारितोषिक | रु.४०,०००/- |
| तृतीय पारितोषिक | रु.३०,०००/- |
| उत्तेजनार्थ पारितोषिक | रु.२०,०००/- |

**१. दिग्दर्शनासाठी–**

| | |
|---|---|
| प्रथम पारितोषिक | रु.८०००/- |
| व्दितीय पारितोषिक | रु.६०००/- |
| तृतीय पारितोषिक | रु.४०००/- |

**२. वैयक्तिक अभिनय(पुरुष)**

| | |
|---|---|
| प्रथम पारितोषिक | रु.५०००/- |
| व्दितीय पारितोषिक | रु.३०००/- |

**३. वैयक्तिक अभिनय(स्त्री)**

| | |
|---|---|
| प्रथम पारितोषिक | रु.५०००/- |
| व्दितीय पारितोषिक | रु.३०००/- |

| | | |
|---|---|---|
| ५. | **नेपथ्य–** | रु.४०००/- |
| ६. | **प्रकाशयोजना** | रु.४०००/- |
| ७. | **वेशभूषा** | रु.४०००/- |
| ८. | **ध्वनिसंकलन/पार्श्वसंगीत** | रु.४०००/- |
| ९. | **रंगभूषा** | रु.४०००/- |

१०. **नाटयलेखन**

| | |
|---|---|
| प्रथम पारितोषिक | रु.७०००/- |
| व्दितीय पारितोषिक | रु.५०००/- |

११. खास स्पर्धेसाठी अनुवादित/रुपांतरित केलेल्या संहितेसाठी पारितोषिक रु.७,०००/-

**एकूण रु.२,१३,०००/-**

३७. सदर स्पर्धेसाठी पारितोषिक निर्धारित करण्यात आली आहेत त्यासाठी पृष्ठ क्र. ६ व ७ पहावा.

३८. स्पर्धेतील कोणतेही पारितोषिक विभागून दिले जाणार नाही.

३९. उशिरा आलेल्या व  अपूर्ण प्रवेशिका ग्राहय धरल्या जाणार नाहीत.

४०. या नियमावलीत कोणत्याही क्षणी व कोणत्याही टप्प्यावर फेरफार करण्याचा संपूर्ण अधिकार कला अकादमीने राखून ठेवला आहे व असा फेरफार केल्यास तो स्पर्धक संस्थांवर बंधनकारक  राहिल.

४१. या नियमाबद्‌दल कोणतीही शंका निर्माण झाल्यास कला अकादमीच्या अध्यक्षांचा त्यासंबंधीचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक राहील.

कला अकादमी गोवा

# मराठी नाटयस्पर्धा-( 'अ' व 'ब' विभाग)

## नाटकासंबंधी माहिती

सदर तपशिलाच्या पाच प्रती प्रयोगाच्या दिवशी सायं.७.00 वाजेपर्यंत कला अकादमीच्या प्रतीनिधीकडे देणे आवश्यक आहे.

संस्थेचे नाव:------------------------------------------------------------------

नाटकाचे नाव :-----------------------लेखकाचे नाव:-----------------------------

नाटक आधारित/अनुवादित/रुपांतरीत असल्यास मुळ नाटक:-----------लेखक:-------

दिग्दर्शकाचे नाव :---------------------प्रकाशयोजना:------------------------------

नेपथ्य :-----------------------------पार्श्वसंगीत/ध्वनीसंकलन :---------------------

वेशभूषा :---------------------------रंगभूषा :-----------------------------------

| भूमिका | कलाकार |
|---|---|
| १----------------- | ------------------------------ |
| २)---------------- | ------------------------------ |
| ३)----------------- | ------------------------------ |
| ४)----------------- | ------------------------------ |
| ५)----------------- | ------------------------------ |
| ६)----------------- | ------------------------------ |
| ७)----------------- | ------------------------------ |
| ८)----------------- | ------------------------------ |
| ९)----------------- | ------------------------------ |
| १०)---------------- | ------------------------------ |

नाटयप्रयोगासाठी लागणारा एकूण वेळ :--------------मिनिटे. अंक :एक/दोन.
मध्यंतर :--------------- (एक/दोन) मध्यंतरासाठी लागणारी वेळ :------------मिनिट.
दोन मध्यंतर असल्यास: पहिला मध्यंतर:------ मिनिटे/दुसरा मध्यंतर :------ मिनिटे
स्पर्धेच्या नियमाना अनुसरुन वर नमूद करण्यात आलेली संपूर्ण माहिती खरी आहे.

तारीख :

-------------------

स्वाक्षरी
अध्यक्ष/सचिव

संस्थेचा शिक्का

नाव :----------------------------

# कला अकादमी गोवा

## मराठी नाटयस्पर्धा–'अ' व 'ब'गट

### प्रवेश अर्ज

प्रति
सदस्य सचिव,
कला अकादमी गोवा
पणजी–गोवा

महोदय,
कला अकादमी गोवा आयोजित २० – २० वर्षीच्या मराठी नाटयस्पर्धेतील अ/ब गट नाटयस्पर्धेत आम्ही भाग घेऊ इच्छितो.

संस्थेचे नाव : ------------------------------------------------------------

संपूर्ण पत्ता :------------------------------------------------------------

दूरध्वनी क्र.--------------------संपर्क भ्रमणध्वनी क्र.----------------------------

संस्था रजिस्ट्रेशन क्रमांक व तारीख :--------------------स्पर्धेतील विभाग : अ/ब (कृपया उल्लेख करा)

नाटयस्पर्धेत सादर होणारे नाटक :-------------------- लेखकाचे नाव ------------

नाटक रुपांतरीत/अनुवादित/आधारित असल्यास,मूळ नाटक/साहित्यप्रकार:---------------

भाषा------------लेखक :----------------

नाटक खास स्पर्धेसाठी लिहिले आधारित/अनुवादित/रुपांतरीत केले आहे का ? होय/नाही.

प्रवेश शुल्क आणि अनामत रक्कम:----------पावती क्रमांक :------------ दिनांक :------

स्पर्धेचे सर्व नियम व अटीचें पालन करण्यास आमची संस्था बांधील राहील.

तारीख : --------------------------

स्वाक्षरी

संस्थेचा शिक्का अध्यक्ष/सचिव

नाव : ------------------------------

टिप:सदर प्रवेशिका निर्धारित मुदतीत प्रवेश शुल्क आणि अनामत रकमेसह कला अकादमी कार्यालयात पोचती करणे आवश्यक आहे. प्रवेशिकेसोबत प्रत्येक संस्थानी आपल्या संस्थेच्या नोंदणीचे प्रमाणपत्र व आपल्या बँक खात्याचा तपशील (xerox copy of Passbook cancelled cheque) जोडणे आवश्यक आहे.

कला अकादमी गोवा

Kala Academy Goa, Campal, Panaji - Goa - 403 001
Ph. (0832) 2420451, 52, 53, 54 Telefax : (0832) 2420457
E-mail: kalaacademygoa@yahoo.co.in
Website: www.kalaacademygoa.co.in